■ प्रतिसाद ■

# आरोग्यसेवेत आमूलाग्र सुधारणा करण्याचा अजेंडा हवा!




**अनंत फडके**

'वैद्यकीय क्षेत्रातील दोन महत्त्वाचे प्रश्न' या छोट्या लेखात आशुतोष दिवाण यांनी कॉर्पोरेट हॉस्पिटलनामक केवळ नफेखोरीसाठी चाललेल्या इस्पितळांमुळे उभे ठाकत असलेल्या धोक्यांकडे लक्ष वेधले आहे, हे स्वागतार्ह आहे. छोटी इस्पितळे व रुग्ण या दोघांचे नुकसान करणारी ही कॉर्पोरेट हॉस्पिटल्स विशेषतः मोदी सरकारच्या काळात अधिकाधिक प्रभुत्व गाजवू लागली आहेत. मोदी सरकार 'अमेरिकन मॉडेल'कडे झुकणारे असल्याने अमेरिकेत विमा कंपन्यांच्या प्रभावामुळे ही कॉर्पोरेट हॉस्पिटल्स जी अनेक गैरकृत्ये करतात तीच 'परंपरा' भारतात रुजू लागली आहे. दिवाण यांच्या लेखामुळे त्याबाबत एक इशारा मिळाला आहे. दिवाण यांनी नोंदवले हे की डॉक्टर्स व इतर कर्मचारी यांनी केलेल्या चुकांमुळे अमेरिकेत दर वर्षी ४४,००० जण दगावतात. खरे तर हे प्रमाण यापेक्षा जास्त आहे. अलीकडे म्हणजे २०१३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या एका संशोधनानुसार निरनिराळ्या अभ्यासांमध्ये आढळले आहे की दरवर्षी अमेरिकेत इस्पितळात दाखल झालेल्यांपैकी सुमारे ०.६ ते १.४ टक्के रुग्ण डॉक्टर्स व इतर कर्मचारी यांनी केलेल्या चुकांमुळे दगावतात. हे लक्षात घेता डॉक्टर्स व इतर कर्मचारी यांनी केलेल्या चुकांमुळे दरवर्षी अमेरिकेत एकूण २ ते ४ लाख मृत्यू होतात! अमेरिकेत मृत्यू होण्याचे हे तिसऱ्या क्रमांकाचे कारण आहे! युरोपमध्ये अमेरिकेपेक्षा खूप चांगली आरोग्यव्यवस्था आहे, तिथे हे प्रमाण एवढे नाही. कॉर्पोरेट्स व आरोग्य-विमा कंपन्या यांच्या अभद्र युतीमुळे अमेरिकेत ही स्थिती उद्भवली आहे. मोदी सरकार नेमकी अमेरिकन व्यवस्थेसारखी व्यवस्था आणू पाहत आहे!

डॉक्टर्स व इतर कर्मचारी यांनी केलेल्या चुकांमुळे रुग्णांचे नुकसान होण्याचे, दगावण्याचे प्रमाण भारतात किती आहे याचा काही अभ्यास


ईमेल : anant.phadke@gmail.com

झालेला नाही. छोटी इस्पितळे ही केवळ छोटी आहेत म्हणून त्यात हे प्रमाण खूप कमी आहे असे गृहीत धरता येणार नाही. अशास्त्रीय उपचार देण्याचे प्रमाण भारतात अमेरिकेपेक्षा नक्की जास्त आहे कारण डॉक्टरांच्या उपचाराचे प्रमाणीकरण भारतात अमेरिकेपेक्षा खूपच कमी, खरं तर नगण्य आहे.

क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्टबाबतचे आशुतोष दिवाण यांचे म्हणणे मात्र गैरसमजावर आधारले आहे. बॉम्बे नर्सिंग होम किंवा 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट' हा ॲक्ट अमेरिकेकडे तोंड करून तयार केला आहे हे त्यांचे म्हणणे वस्तुस्थितीशी विसंगत आहे. एक तर 'बॉम्बे नर्सिंग होम रजिस्ट्रेशन ॲक्ट' हा १९५० पासून फक्त महाराष्ट्रापुरता आहे तर 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट' हा केंद्र सरकारने २०१३ मध्ये आणला. त्यांचा एकमेकांशी काही संबंध नाही. दुसरे म्हणजे दर खाटेमागे किती जागा असावी, दवाखाना किमान किती क्षेत्रफळाचा असायला हवा इत्यादी मापदंड 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट'नुसार ठरवण्याचे काम अजून चालू आहे. या मापदंडाबाबतचा प्रस्ताव अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार दवाखान्यासाठी १०० चौरस फूट असावी असा प्रस्ताव आहे. हे सर्व न पाहता इंडियन मेडिकल असोसिएशनने या क्षेत्रफळाबाबत तसेच एकंदरीतच 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट'बाबत धादांत खोटा प्रचार केला आहे. त्याला बळी न पडता वस्तुस्थिती समजावून घ्यायला हवी. केंद्र सरकारने पारित केलेल्या 'क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट'मध्ये काही सुधारणा करून 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट' असा कायदा महाराष्ट्रात आणावा अशी मागणी आम्ही खोलात अभ्यास करून जनआरोग्य अभियानतर्फे केली आहे. खाजगी वैद्यकीय सेवेचे प्रमाणिकरण झाल्याशिवाय रुग्णांना काही किमान न्याय मिळू शकणार नाही हे निश्चित. हे लक्षात घेऊन जनआरोग्य अभियानने 'महाराष्ट्र क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट ॲक्ट' प्रस्तावित केला आहे. असा कायदा आला तर त्यात प्रामाणिक डॉक्टर्सचे नुकसान होणार नाही.

खरे तर भारतात 'युनिवर्सल हेल्थ केअर' अशी व्यवस्था निर्माण करणे करून प्रत्येक नागरिकाला दर्जेदार आरोग्यसेवा मोफत उपलब्ध करू देणे शक्य आहे. त्यासाठी 'सार्वजनिक आरोग्य सेवेत मोठी वाढ व सुधारणा करणे, खाजगी सेवेवर नियंत्रण करणे व त्यातील काही सेवा सरकारने खरेदी करून जनतेला मोफत उपलब्ध करून देणे अशी पावले उचलायला हवी. बाराव्या पंचवार्षिक योजनेअंतर्गत हे साध्य करण्यासाठी सरकारने नेमलेल्या High Level Expert Group (HLEG) ने त्यासाठी केलेला रिपोर्ट सरकारी संकेतस्थळावर उपलब्ध आहे. मोदी सरकारने त्याच्या उलट दिशेने प्रवास सुरू केला आहे. दिवाण यांनी दाखवलेला धोका टाळायचा असेल, कॉर्पोरेट्सच्या विळख्यातून रुग्णांना, चांगल्या छोट्या खाजगी इस्पितळांना वाचवायचे असेल तर 'युनिवर्सल हेल्थ केअर'साठी आरोग्यसेवेत आमूलाग्र सुधारणा करण्याचा कार्यक्रम मांडायला हवा. ●

**संदर्भ**


१. A new, evidence-based estimate of patient harms associated with hospital care
http://www.ncbi.nlm.nih.gov/pubmed/23860193



## वर्गणीसाठी

आपली वर्गणी वाटसरू कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवताना नाव, पत्ता, फोन नंबर व ई-मेल इत्यादी तपशील कळवावेत. वर्गणीची रक्कम रोख/मनिऑर्डर/चेक/डीडी/ऑनलाईन यांपैकी कोणत्याही मार्गाने पाठवू शकता. चेक अथवा ड्राफ्ट **'परिवर्तनाचा वाटसरू'** या नावाने असावा. वर्गणी ऑनलाईन भरण्यासाठी आमच्या www.pvatsaru.com या संकेतस्थळाला भेट द्या.

– १ वर्षासाठी वर्गणी : ₹ ३५०
– ३ वर्षांसाठी वर्गणी : ₹ ९००
– १० वर्षांसाठी वर्गणी : ₹ २५००
– सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक वर्गणी : ₹ २५०
– सॉफ्ट + छापील अंकाची वार्षिक वर्गणी : ₹ ४५०

**● कार्यालयाचा पत्ता ●**

व्यवस्थापक, परिवर्तनाचा वाटसरू,
द्वारा : द युनिक ॲकॅडमी,
चौथा मजला, गुरुकृपा कॉम्प्लेक्स,
११७९/४, शिवाजीनगर, पुणे ४११००५.

**कोणत्याही महिन्यापासून वर्गणीदार होता येते.**